अतित्वर्य

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.एच.ओ./ 2262
दि. 04/06/2018

कार्यालयीन परिपत्रक

विषय : ताणतणाव विरहित कार्यप्रणाली व कार्यकौशल्ये तसेच आनंदी व यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली या विषयीच्या कार्यशाळेस उपस्थित रहाणेबाबत.

पुणे मनपाचे मुख्य इमारतीमधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता शुक्रवार दि.०८ जून २०१८ रोजी दु.३:३० ते ५:३० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज सभागृह तिसरा मजला येथे ताणतणाव विरहित कार्यप्रणाली व कार्यकौशल्ये तसेच आनंदी व यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली या विषयीची मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली असुन सदर कार्यशाळेत जागृती महिला व बालकल्याण संस्था पुणे यांचेकडील तज्ञ मानसोपचार तज्ञ कार्यशाळेस मार्गदर्शन करणार आहेत.

तरी पुणे मनपाचे मुख्य भवन इमारतीमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विषयांकित कार्यशाळेस शुक्रवार दि.०८ जून २०१८ रोजी दु.३:३० ते ५:३० या वेळेत पुणे महानगरपालिका छत्रपती शिवाजी महाराज सभागृह,तिसरा मजला येथे उपस्थित राहून सदर कार्यशाळेचा लाभ घेणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

(डॉ.अंजली साबणे)
सहा. आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत/-

मा.सर्व खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका.